# प्रकरण पहिले

# प्रकरण १
# प्रस्तावना आणि संशोधन आराखडा

## १.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेची गरज, व्याप्ती आणि योजनेचे प्रशासन याबाबतची माहिती घेण्यात आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सुरूवात कशी झाली यातूनच भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्व दिसून येईल. भारताला मोठया प्रमाणात नैसर्गिक व मानवी साधन सामुग्री लाभलेली असून भारत हा नैसर्गिक व भौगोलीक विविधीकरण लाभलेला देश आहे. भारत मोठी लोकसंख्या असलेला देश असून २००१ च्या जनगणणेनुसार भारताची लोकसंख्या १०२.७ कोटी इतकी आहे व हे प्रमाण जगाच्या लोकसंख्येच्या १६ % इतके आहे. दुसऱ्या बाजुला भारताचे भौगोलीक क्षेत्र ३२.८७ लाख चौरस किलोमीटर आहे हे प्रमाण जगाच्या २.४ % इतके आहे. याचा अर्थ मोठया प्रमाणाची लोकसंख्या कमी जमिनीवर अवलबूंन आहे. परिणामतः वाढती लोकसंख्या देशाच्या आर्थिक विकासावर व दरडोई उत्पन्नावर परिणाम करते. जर दरडोई उत्पन्न कमी असेल तर लोकांची खरेदीशक्ती कमी असते आणि त्याचा परीणाम मोठ्या प्रमाणात दारिद्र्य निर्माण होण्यात होतो. सध्या भारताचे दरडोई उत्पन्न ६३० $ इतके आहे १९९९-२००० मध्ये २६ % लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेखाली होती. २००४ मध्ये हे प्रमाण कमी होऊन २३.६ % इतके झाले आहे. मोठ्या प्रमाणातील दारिद्र्य हे जागतिक बाजारपेठेत देशाला गरीब आणि अकार्यक्षम बनविते.[१]

[1] Dr. Anand Patil, General Ability Test (2002), Study Circle Publication, p.90

## १.२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेची गरज

दारिद्र्यातील घट करणे, रहाणीमानाचा दर्जा उंचावणे, रोजगार निर्मिती करणे आणि देशाला अर्थिक विकासाच्या दृष्टीने कार्यक्षम बनविणे यासाठी देशात भारत सरकारने विविध योजना चालू केल्या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही त्यापैकीच एक योजना आहे.

त्याचबरोबर इतर काही दारिद्र्य निमूर्लन व रोजगार निर्मिती कार्यक्रम सरकाराने राबविले आहेत. ते खालील प्रमाणे...

१. एकात्मिक लहान मुले विकास कार्यक्रम

२. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम

३. जवाहर रोजगार योजना

४. रोजगार हमी योजना

५. स्वंय रोजगार प्रशिक्षण योजना

६. राष्ट्रीय रोजगार हमी योजना

७. सार्वजनिक वितरण व्यवस्था

प्रस्तुत अभ्यास हा सार्वजनिक वितरण व्यवस्था ही दारिद्र्य निमूर्लन कार्यक्रम आणि अन्नधान्याच्या टंचाई पासून मुक्तता याचे नेतृत्व करते. सन १९५० ते १९६० या काळात देशात अन्नधान्याची टंचाई भासत होती. अन्नधान्याच्या भाववाढीचा दबावही शहरी भागात होता. तसेच या काळात रोजगार निर्मितीही मर्यादीत होती. म्हणून या काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून अधिक पुरवठा केला गेला आणि किमती स्थिर ठेवण्यात आल्या. म्हणून गरीब वर्गाला मुलभूत/आवश्यक वस्तू पुरविणे आणि अन्नधान्य, कडधान्य व खाद्यतेल यांच्या किंमतीतील चढ उतार कमी करणे यासाठी विशेष अशा कार्यक्रमांची आवश्यकता होती. म्हणून सरकारने सन १९३९ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेची स्थापना केली.

## १.३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेची पार्श्वभूमी

भारतात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विकास अथवा उगम हा दुऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटीशाकडून 'शिधा वाटप पद्धत' यानुसार झाला. वस्तूस्थितीच्या दृष्टीकोनातून विचार करता, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे यश म्हणजे, दुष्काळ व उपासमार या धोक्यापासून दूर करणे आणि सर्वांना अन्न सुरक्षितता मोठ्या प्रमाणात देणे. यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेने महत्वाची भूमिका पार पाडली आहे.

महायुद्धाच्या काळात अशी परिस्थिती निर्माण झाली की, ब्रिटीश सरकारला अन्नधान्याचे सार्वजनिक वाटप काही निवडक कुटुंबाना व निवडक शहरामध्ये करणे भाग पडले. भारत सरकारने १९३९ साली सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सुरवात मुंबई शहरातून केली. परिणामी इतर शहरात तिचा विस्तार वाढू लागला. १९४३ सालापर्यंत १३ शहरे आणि १९४६ पर्यंत ७७१ शहरे सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली आली. ज्या खेड्यामध्ये अन्नधान्याची टंचाई होती अशी खेडीसुद्धा शिधावाटपाखाली आली. अन्नधान्याच्या बाबतीत विशेष लढा देण्यासाठी १९४२ मध्ये भारत सरकारने खाद्य विभागाची निर्मिती केली. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी भारताने तसेच अन्य देशांनी ही पद्धत बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाववाढ मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे १९५० मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा पुन्हा विचार होऊ लागला. सार्वजनिक अन्नधान्य वितरण ही एक सामाजिक नियोजन म्हणून १९५१ मध्ये पंचवार्षिक नियोजनामध्ये विचार करण्यात आला.[२]

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये काही आवश्यक शहरात व ज्या ग्रामीण भागात अन्नधान्याची तीव्र टंचाई होती अशा भागात चालू केली. या पद्धतीचे दोन भाग पाडण्यात आले. त्यामध्ये वैयक्तिक शिधावाटप पद्धती ज्यामध्ये स्वस्त धान्य दुकानामधून अन्नधान्याचे वाटप केले जाते. आणि दुसरी म्हणजे, अवैधानिक शिधा वाटप पद्धती ज्यामध्ये खुल्या बाजारातून अन्नधान्याची उपलब्धता केली जाते. ही पद्धत अशीच पुढे शहरी भागातून चालू राहिली.

---

[2] Mishra, S. K. & Puri, V. K. : Indian Economy, S. Chand & Company Ltd., 2006, p.519

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटपर्यंत अन्नधान्याच्या वितरणामध्ये समाधानकारक समर्पकता पुरवठ्याअभावी ही पद्धत दाखवू शकली नाही.

### १.३.१ व्याख्या

"सरकारच्या नियंत्रीत किंमतीनुसार आवश्यक अथवा महत्वाच्या वस्तूचे वितरण स्वस्त धान्य दुकानाद्वारे अथवा शिधा वाटप दुकानाद्वारे करणे म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्था होय."

रेशन दुकानासाठी अन्नधान्याची उपलब्धता १९५३ मध्ये ५४ द.लक्ष टन होती त्यामध्ये वाढ होऊन १९५४ मध्ये ती ६३.३ द. लक्ष टन झाली. ही परिस्थिती सरकारला भरपूर प्रमाणात अन्नधान्याची प्राप्ती करून देणारी तसेच खाजगी व्यापारी नियंत्रण हटविण्यास चालना देणारी होती. तथापि, १९५८ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन घटून ५८.३ द. लक्ष टन झाले. दुसरी पंचवार्षिक योजना नुकतीच चालू झाली आणि सरकारने धान्या प्राप्तीस उत्तेजन देऊन अन्नधान्याच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यात यश प्राप्त केले. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या गरजेचे पुनःपरिक्षण केले आणि इतर आवश्यक वस्तू उदा. साखर, रॉकेल, तेल इ. वस्तूंचा समावेश सार्वजनिक वितरण व्यवस्थेत केला गेला. रेशन धान्य दुकानांच्या संख्येत वेगाने वाढ झाली होती. १९५७ मध्ये रेशन धान्य दुकानांची संख्या १८००० होती यामध्ये वाढ होऊन १९६१ मध्ये ती ५१००० इतकी झाली. त्याप्रमाणात अन्नधान्याच्या वाटपामध्ये सुद्धा वाढ झाली. अशाप्रकारे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटापर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेत महत्वपूर्ण बदल झाले.[३]

सुरवातीला सार्वजनिक वितरण व्यवस्था ही खाजगी व्यापाराला पर्याय आणि किंमत स्थिरतेचे साधन म्हणून विचारात घेतली गेली. खाजगी व्यापाराची मक्तेदारी असल्याने आपल्याला फायदेशीर असे धोरण ते राबवित असत म्हणून त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. सन १९६० च्या अन्नधान्य टंचाईच्या काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा महत्वाचा हेतू ग्राहकांना कमी

---

[3] ibid, p.2

व स्वस्त किंमतीत अन्नधान्य देण्याचा कार्यक्रम म्हणून होता. सन १९८० च्या शेवटापर्यंत शेतीची रुपरेखा चांगल्या प्रकारे बदलली गेली. हरितक्रांतीच्या परिणामामुळे दरडोई उत्पन्नात महत्वपूर्ण वाढ झाली. असे असले तरी याचा फायदा ग्रामीण कुटुंबे, विशेषतः भूमीहीन शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणात झाला.

अशा पद्धतीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेने किंमत स्थिरतेचे काम केले. तसेच अन्नधान्य टंचाईच्या काळात ग्राहकांची पिळवणूक करून मोठ्या प्रमाणात फायदा घेणाऱ्या खाजगी व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडून काढण्यात प्रभावी शक्ती म्हणून काम केले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मुख्य हेतू आवश्यक वस्तूंचा पुरवठा सवलतीच्या दरामध्ये करणे हा आहे. उदा. साखर, गहू, तांदूळ, रॉकेल इ. तसेच ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या किंमतीही कार्यक्षम व्यवस्थेमार्फत स्थिर ठेवणे. ज्या वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात अलवाचिक आहे अशा वस्तूंच्या पुरवठा आणि उत्पादनात घट झाली असता किंमतीत अप्रमाणशीर वाढ होतेच. सर्वसाधारण अशा वस्तू कृषी अधारित असतात. त्यांच्या किंमती हंगामानुसार बदलत असतात. म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेने अन्नधान्याच्या पुरवठ्याची हमी, समाजाला आवश्यक उपभोग्य वस्तूंचा योग्य किंमतीत पुरवठा यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय अन्न महामंडळाची व इतर संस्थांची स्थापना करण्यात आली. व ही मंडळे शेतकऱ्यांच्या मालाला आधार किंमत जाहीर करून हंगामामध्ये शेतीमाल खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान नफा मिळवण्यासाठी मदत होते आणि शेतमालाच्या किंमतीत स्थिरता ठेवण्यास मदत होते. त्याचवेळी आवश्यक वस्तू सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ग्राहकांना योग्य किंमतीत पुरविल्या जातात.[४]

सन १९८० च्या मध्यापर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्व वाढले गेले. आणि तिचा विस्तार काही राज्याबरोबरच ग्रामीण भागातही करण्यात

---

[4] Datta Ruddar & Sunduram K. P. M. : Indian Economy (2006) S. Chand & Co. Ltd., New Delhi, p.443

आला. विशेष म्हणजे सन १९८५ मध्ये ५७ द.ल. लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक वस्तूंचा पुरवठा सवलतीच्या दराने करण्यात आला. त्यानंतर सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. त्यानंतर रेशन धान्य दुकानांच्या संख्येत वाढ होऊन प्रामुख्याने ग्रामीण भागातही त्यांचा विस्तार झाला. अल्पकालीन किंमतीतील चढ-उतारापासून गरीबांचे संरक्षण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अलिकडे सुरवात झाली असे संबोधले जाते.

अलिकडे सार्वजनिक वितरण व्यवस्थेत परिणामकारक बदल करण्यात आले आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेची नविन उद्दीष्टचे म्हणजे अन्नधान्यातील प्रादेशिक विषमता कमी करणे. तसेच दारिद्र्याच्या प्रमाणानुसार राज्याराज्यात वाटप करणे. तथापि, सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे गरिबांना इतर ग्राहकांपेक्षा निम्म्या किंमतीत धान्य पुरविणे. व उत्पन्नाच्या मर्यादेवर आधारित रेशनकार्ड देणे इ. उद्दीष्टचे आहेत.

## १.४ सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्नसुरक्षितता

### १.४.१ अन्नसुरक्षिततेची व्याख्या

**१) १९८६ चा जागतिक विकास अहवाल**

"अन्नसुरक्षितता म्हणजे सर्व लोकांना सर्व वेळी कार्यात्मक व आरोग्यदायी आयुष्यासाठी पुरेसे अन्न मिळणे होय."

**२) अन्न व शेती संघटन (१९८३)**

"अन्नसुरक्षितता म्हणजे सर्व लोकांना सर्व वेळी भौतिक व अर्थिक या दोन्ही दृष्टीने आवश्यक मुलभूत अन्न मिळणे होय. त्याची खात्री देणे होय."

वरील व्याख्यांवरून या संकल्पनेत पुढील मुद्द्यांचा समावेश होतो.

१. अन्नसुरक्षिततेत देशातील सर्व लोकांना अन्नाची भौतिक सुरक्षितता असावी.

२. सर्वांना पुरेसे अन्न उपलब्ध असले पाहिजे. याचाच अर्थ लोकांकडे पुरेशी खरेदी शक्ती आवश्यक असते. ज्यायोगे त्यांना आवश्यक असलेले अन्न ते संपादित करतील.

३. निरोगी आयुष्यासाठी लोकांच्या पोषणयुक्त गरजा भागविण्यासाठी उपलब्ध असणारे अन्न संख्यात्मक तसेच गुणात्मक दृष्टीने पुरेसे असले पाहीजे.

४. देशाने अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्णता संपादन करावी तथापि, अन्नसुरक्षा संकल्पनेत दिर्घकाळात ते वेळेवर, खात्रीने पोषणयुक्त व पुरेशा प्रमाणात करण्याची गरज आहे.[५]

## १.४.२ पौष्टिक अन्न/ पौष्टिकता

देशाची लोकसंख्या वाढत असताना अन्नधान्य, कडधान्य व डाळी यांचे उत्पादन वाढत गेले. काही वर्षे वगळता कडधान्याची उपलब्धता वाढत गेली. तरीही कडधान्याची निव्वळ उपलब्धता वाढविण्यासाठी इतर देशाकडून कडधान्याची आयात करावी लागली.

गेल्या ५० वर्षाच्या काळात देशातील लोकांच्या आणि मुलांच्या पोषणामध्ये कमी अधिक प्रमाणात घट झाली आहे. आणि देशातील काही भागातील लोकांच्या पोषणामध्ये सुधारणा झाली आहे. काही भागात सौम्य स्वरूपात कुपोषणाचे प्रमाण आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र आणि ओरिसा कारण या राज्यातील काही भागात लोकांची खरेदी शक्ती कमी आहे.

राष्ट्रीय पोषक अन्न देखरेख मंडळाच्या मतानुसार सन १९७५—८० मध्ये ३० टक्के कुटुंबातील सर्व व्यक्तिंना पुरेशा प्रमाणात उपभोग उर्जा मिळत होती तर १९ टक्के कुटुंबातील व्यक्तिंना अपुरी उपभोग उर्जा मिळत होती. प्रतिदिनी डाळीचा उपभोग प्रतिव्यक्ती ४० ग्रॅम मिळाला पाहीजे. १९९६—९७ मध्ये डाळीचा/कडधान्याचा उपभोग ३४ ग्रॅम प्रतिव्यक्ती प्रतिदिन इतका आहे. अशा प्रकारे गरीबाची ही परिस्थिती डाळीच्या/कडधान्याच्या उपभोगाबाबत वाईट झाली आहे.

---

[5] ibid, p.492

मनुष्याला दररोज २२५० उष्मांक देणारा आहार मिळाला पाहिजे मात्र कमी उत्पन्न गटातील लोकांना सरासरी २२५० पेक्षा कमी उष्मांक मिळतो तर उच्च उत्पन्न गटातील लोकांना सरासरी २६०० कॅलरीज् मिळतात. १९५०—५१ मध्ये अन्नधान्याची व कडधान्याची उपलब्धता दरडोई ३५४ ग्रॅम होती ती १९९६—९७ मध्ये ४९९ ग्रॅम इतकी झाली. या ४७ वर्षाच्या कालावधीत दरडोई अन्नधान्याच्या उपलब्धतेत ३०.६८ टक्के इतकी वाढ झाली. तर याच कालावधीत कडधान्याची उपलब्धता ६४.७ ग्रॅमवरून ३५.६ ग्रॅम एवढी झाली. म्हणजेच दरडोई ४५ टक्के घट झाली. लोकांना पौष्टीकतेचे शिक्षण देऊन उपलब्ध हिरव्या भाज्या, आयोडीनयुक्त मीठ याचा उपभोग घेऊन पौष्टिक आहारात सुधारणा करता येते.

१५ ऑगष्ट २००१ मध्ये पंतप्रधानांनी राष्ट्रीय पोषण कार्यक्रम खालील हेतुसहीत जाहीर केला.

१. कुपोषणात घट करणे.

२. पोषण तत्वातील सुक्ष्म घटकात वाढ करणे म्हणजे लोह, आयोडीन, व्हिटॅमीन 'A'

३. उर्जा उपभोगात वाढ करणे.

या दृष्टीकोनातून दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२-२००७) पौष्टिकतेबाबत २००७ पर्यंत विविध हेतू साध्य करावयाचे होते.

महत्वाचे हेतू पुढीलप्रमाणे...

१) पालमुल आणि मुलाचे पोषण यामध्ये सुधारणा घडवून आणणेस पोषण आणि आरोग्य यांचे शिक्षण चालू करणे.

२) २५ टक्केने अनिमिया घट करणे.

३) सार्वजनिक आरोग्य केंद्राव्दारे 'A' व्हिटॅमीनची उणीव दूर करणे.

४) आयोडीनची उणीव २०१० पर्यंत १० टक्के पेक्षा कमी करणे.

अशाप्रकारे अन्नसुरक्षिततेमध्ये पौष्टिकतेचे महत्व आहे. याची भूमिका लोकांची पोषणतत्वाची स्थिती चांगली ठेवणे व त्यांना कार्यक्षम बनविण्यास महत्वाची आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे लोकांना पुरविले जाणारे धान्य पोषणतत्वाच्या आधारावर निरिक्षण करून दिले पाहीजे. गेल्या काही दशकामध्ये भारताला अन्नसुरक्षिततेच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागले. अन्न व शेती संघटनेच्या मतानुसार ४०० द.ल. लोक गरीब व भूकेले आहेत. देशात अन्नधान्याचा तुटवडा व उपासमार यांचा सराव झालेला आहे. अन्नसुरक्षिततेची गरज का आहे, हजारो लोक कुपोषण व भूकेने मरतात बफर स्टॉकची गरज का आहे हे पाहिले पाहिजे. सध्याचा संशोधनाचा हेतू सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा गरिबीवर व अन्नसुरक्षिततेवर कसा परिणाम झाला आहे याचे मुल्यमापन करणे हा आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेबद्दल बरेच वादविवाद निर्माण झालेले आहेत. भारतात खेड्यातील व्यक्ती एकूण उत्पन्नापैकी ६४ टक्के उत्पन्न अन्नधान्यावर खर्च करतात. १९००—२००० मध्ये २०० द.ल. टन अन्नधान्य उत्पादन झाले सर्वसाधारणपणे २५ द.ल. टन सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविले गेले. भारतातील नियोजकांनी सुरवातीपासूनच अन्नधान्याच्या स्वावलंबनाचे उद्दीष्ट ठेवले आहे. तिसऱ्या योजनेनंतरच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. ज्याला आपण हरित क्रांती म्हणतो. यामुळे अन्नधान्याच्या तुटवड्या विरूद्ध मात करणेस मदत झाली. म्हणून अन्नधान्यचा अपुरेपणा व तुटवडा याची जाणिव बराच काळ झाली नाही. तथापि, अजूनही लाखो गरीब लोक उपाशी व कुपोषित आहेत. आणि पुढे आणखी वाढण्याची भिती नाकारता येत नाही. म्हणून कुपोषण व उपासमार यांच्यावर मात करण्यासाठी एकच साधन म्हणजे अन्नसुरक्षितता अर्थात भारतीय सार्वजनिक वितरण व्यवस्था होय.[६]

नवव्या पंचवार्षिक योजनेत (१९९७—२००२) अन्नसुरक्षिततेचा हेतू कुटुंबांना अन्नधान्यासाठी भौतिक व अर्थिक साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध

6 Mishra, S.K. & Puri, U.K. : Indian Economy (2002), Himalaya Publishing House, New Delhi, p. 513

करून देणे. तसेच ते योग्य प्रमाणात चांगल्या दर्जाचे व परवडण्याजोगे असावे. या तत्वावर आधारलेली होती. यामुळे एक प्रश्न निर्माण होणार होता तो म्हणजे अन्नधान्याच्या किंमती व लोकांच्या हातातील खरेदी शक्ती. यासाठी सरकारने गरिबांना मदत करणेसाठी किंमती कार्यक्रम व सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सुरवात केली.

दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२—२००७) उपभोग पॅटर्न वरती लक्ष केंद्रीत करण्यात आले. ज्यामध्ये दुसऱ्या हरितक्रांतीचा विचार केला गेला आहे. अर्थिक विकासाची निष्पत्ती म्हणून उपभोग पद्धतीतील बदलामध्ये कडधान्ये व डाळी यांचा उपभोग वाढला आहे.

## १.५ गृहीतक

अभ्यासासाठी खालील गृहीतक घेतले आहे.

कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका ही समाजातील गरीबांना स्वस्त धान्य पुरवठा करण्यामध्ये कमकुवत आहे.

## १.६ समस्येचे विधान

सध्याचा अभ्यास कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील स्वस्त धान्य दुकानांचा विशेष अभ्यास आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्वाचे काम म्हणजे भारतीय समाजातील दारिद्र्य व असमानता कमी करणे असे आहे. मात्र सध्याच्या काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका ही दारिद्र्य निमुर्लन कार्यक्रमात इतर दारिद्र्य निमुर्लन कार्यक्रमाशी तुलना केली असता कमकुवत आहे.

## १.७ संशोधन पद्धती

अभ्यास प्राथमिक माहितीवर आधारीत आहे. ही माहिती प्रश्नावली, मुलाखत व अभ्यासाच्या ठिकाणाला प्रत्यक्ष भेटी देऊन गोळा केली आहे. आवश्यक माहिती ऑफिशियल कागदपत्रे, सरकारी रिपोर्ट, आर्टिकल इ. दुय्यम स्त्रोतातून घेतली आहे. तालुक्यातील ८६ खेड्यापैकी १० खेडी व प्रत्येक

खेड्यातील १० व्यक्ती अशी नमुना निवड केली आहे. माहितीचे विश्लेषण करणेसाठी गणिती पद्धतींचा वापर केला आहे.

## १.८ अभ्यासाचा हेतू

अभ्यासासाठी खालील महत्वाचे हेतू घेतले आहेत.

१. कागल तालुक्यातील रेशन दुकानांचे स्वरूप व कार्ये यांचा अभ्यास करणे.

२. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या धान्याच्या किंमती व दर्जा यांचा अभ्यास करणे.

३. कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील समस्यांचा अभ्यास करणे.

४. कागल तालुक्यातील दारिद्र्य निमुर्लन करणेसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा महत्वपूर्ण उपयोगाचा अभ्यास करणे.

## १.९ साहित्याचा मागोवा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अद्याप म्हणावे तसे काम झालेले नाही. शिवाजी विद्यापीठात अत्यल्प काम झालेले आहे.

पर्यावरणीय अर्थशास्त्रात डॉ. पी. ए. कोळी व डॉ. व्ही. व्ही. महामुनी यांनी कोल्हापूरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन या विषयावर अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांना असे आढळून आले की कचरा गोळा करणाऱ्या महिलांना रेशन कार्डवरील धान्याशिवाय पर्यायच नाही.[७]

डॉ. श्री तापकीर यांनी सहकारी ग्राहक संस्था कशा बळकट करता येतील यावर संशोधन लेख प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये त्यांनी ग्राहक सहकारी संस्था तोट्यात चालल्या आहेत असे म्हटले आहे. तसेच अशा संस्थांना रास्त भावाची दुकाने चालविण्याचा परवाना दिल्यास ग्राहक सहकार फायद्यात येईल

---

7 Dr. Koli, P. A. & Dr. Mahamuni, V. V. (2005) : Environmental Economics of Solid Waste Management

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. खाजगी दुकानदार ही व्यवस्था नीट चालवत नाहीत. त्यामुळे शासनाने ग्राहक सहकारी संस्थावर विश्वास टाकणे योग्य वाटते.[८]

डॉ. सी. कुसूमकर हेब्बार यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेत बरेच घोटाळे असल्यामुळे ही व्यवस्था सहकारी ग्राहक भांडाराकडे सोपविण्यात यावी असे मत व्यक्त केले आहे. त्यांनी रास्त भाव दुकानांचा प्रारंभ दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झाला असे नमुद केले आहे. त्यानंतर काही काळ ही व्यवस्था स्थगित करण्यात आली होती. तथापि, १९६२ मध्ये भारत-चीन युद्धात रास्त भाव दुकानांची व्यवस्था पुन्हा कार्यान्वयीत करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावरून अन्नटंचाई, दुष्काळ, महायुद्धे व युद्धे इ. अतिअडचणीच्या काळात शासनाला स्वस्त धान्य दुकानांशिवाय पर्याय नसतो. हेब्बार यांनी असेही म्हटले आहे की सार्वजनिक वितरण व्यवस्थेत विकल्या जाणाऱ्या वस्तूवर फारच कमी दुरावा (मार्जिन) मिळत असल्याने ही दुकाने तोट्यात चालली आहेत. तसेच या दुकानांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी त्यांचा संबंध सहकारी बाजार यंत्रणेशी जोडावा असे सुचविले आहे व हा विचार योग्य वाटतो.[९]

डॉ. एस्. नकीरन यांनी गावपातळीवरील शेतकी सहकारी पतसंस्था कशा सशक्त करता येतील यावर लेख प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये त्यांनी ज्या राज्यात अशा संस्था कमकुवत आहेत त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्याची संधी द्यावी असे म्हटले आहे.[१०]

डॉ. प्रविण जाधव यांनी जागतिकरण आणि अन्नधान्य उत्पादन यावर लेख प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये त्यांनी भारतासारख्या देशाची लोकसंख्या

---

[8] Tapkir, M. M. : Crave of Strengthening the Consumer Co-operative, Reasserting the Co-operative Movement (Published on the occasion of centennial Celebration of Indian Co-perative Movement) Edited by Dr. P. A. Koli and Dr. V. B. Jugale

[9] Dr. C. Kusumakara Hebbar : Role of Consumer co-operative in Public Distribution System Co-operativies in the New Millennium. Edited by R. SIvaraju, Nov. 1998

[10] S. Nakkiran : The Concept of Viability and the Reorganisation of PACS, Indian Co-operative Review, Vol. XV, No. 1, Oct. 1997

१०० कोटीच्या पुढे गेल्याने अन्नधान्य सुरक्षितेकडे जास्त लक्ष देण्याचा इशारा दिला आहे.[११]

डॉ. पी. ए. कोळी यांनी हैद्राबाद येथे एका राष्ट्रीय परिसंवादात सोलापूर जिल्ह्यातील अन्नधान्य बँकेवर संशोधन लेख सादर केला. त्यामध्ये त्यांनी दारफळ येथिल ग्रामीण अन्नधान्य बँकेने पावसाळ्यात गरीब लोकांना दिलासा दिला आहे. असे मत मांडले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत मिळणारा अन्नधान्याचा पुरवठा अपूरा असल्याने अशा पर्यायी संस्था अंत्यंत उपयुक्त आहे. असा त्यांनी उल्लेख केला आहे.[१२]

डॉ. झेव्हीयर विल्सन यांनी अंदमान आणि निकोबार बेटावरील आदिवासी लोकांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांनी अंदमान निकोबार बेटावरील गरीब आदिवासी लोकांना रास्त भाव दुकानाशिवाय पर्याय नाही असे म्हटले आहे. कारण या भागात अन्नधान्याचे उत्पादन अत्यल्प आहे. अशा परिस्थितीत लोकांच्या जगण्याचे एकमेव साधन म्हणजे रास्त भाव दुकाने आणि सहकार भांडारे असे म्हटले आहे.[१३]

भारत सरकारने सन २००७- ०८ साठी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्था गरीबासांठी चालू राहील असे नमुद केले आहे. केंद्र सरकार गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल आणि रॉकेल यांची विक्री रास्त भाव दुकानामार्फत केली जाईल असे म्हटले आहे. अशी विक्री सुमारे ५ लाखापेक्षा जास्त दुकानातून केली जाणार आहे असे म्हटले आहे. केंद्र सरकारनेच विशिष्ट कार्डधारकांना विशिष्ट प्रमाणात धान्य देण्यात येईल असे धोरण आखले आहे. अशा वितरीत केल्या जाणाऱ्या

---

[11] प्रा. प्रविण जाधव : जागतिकीरण – भारतासमोरील आव्हाने

[12] डॉ. पी. ए. कोळी : अन्नसुरक्षिततेसाठी अन्नधान्य सहकारी बँक, राष्ट्रीय परिसंवाद, उस्मानिया युनिर्व्हसीटी, हैद्राबाद, २००४

[13] X Lourdes Xavier Wilson : Role of Co-operative in Tribal Development – A Study in Andaman and Nikobar Island, Unpublished Ph. D. Thesis, Bharathiar University, Coimbatore

अन्नधान्यासाठी केंद्र सरकारने आपल्या अंदाज पत्रकात अनुदानाची तरतूद केली आहे.[१४]

## १.१० शोधप्रबंधाची रुपरेषा

खालील प्रमुख पाच विभागामध्ये हा प्रबंध विभागला गेला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना व संशोधन आराखडा यांचा विचार केला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये कागल तालुक्याच्या सामाजिक व आर्थिक स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप व कार्य यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये रेशन धान्य दुकानातून पुरविलेल्या वस्तू व त्यांच्या किंमती, जमा केलेल्या प्राथमिक माहितीचे स्पष्टीकरण व सांख्यिकी विश्लेषण केलेले आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील समस्यांचे विवेचन केले आहे.

पाचव्या प्रकरणात अभ्यासाच्या ठिकाणी मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप व व्यवस्थापन सुधारणेसाठी उपाय सुचविण्यात आलेले आहेत.

---

[14] भारत सरकारचा आर्थिक पहाणी अहवाल, २००६–०७